N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** परतवाडा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0524 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/05/2023 02:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 08/05/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/05/2023
**Time From (वेळेपासून):** 17:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/05/2023 **Time (वेळ):** 01:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/05/2023 01:28 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 500 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** एच बी आय स्टे बक ऑफ इंडीया पर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

N.C.R.B (एन.सी.आर.बी.)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** जयंत पंजाबराव जायभाये

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1966

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रुक्मीनी नगर, देवमाळी, परतवाडा,परतवाडा,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | रुक्मीनी नगर, देवमाळी, परतवाडा,परतवाडा,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (टोपणनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती दिपाली सोळंके | | | 1. पंचायत समिती कटर क्र 4 दर्यापु,परतवाडा,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री. पांडुरंग धोंडुजी पवार | | | 1. बेकरा ताआकोट जि अकोला, परतवाडा,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | मेमरी कार्ड | 16,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

16,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हकीकत- अशा प्रकारे आहे की दिनांक 08/05/2023 रोजी मी श्री. जयंत पंजाबराव जायभाये, वय 57 वर्ष, व्यवसाय- नौकरी (प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी) रा. रुक्मीनी नगर, देवमाळी, परतवाडा ता. अचलपुर जि. अमरावती मो.नं. 9420722149, 9834553476 मी वर नमुद पत्यावर राहत असुन, दिनांक 06.05.2023 रोजी पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचे समक्ष एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबंधाने माझी लेखी तक्रार नोंदविली व तक्रारीवर मी स्वाक्षरी केली. माझी लेखी तक्रार,पुढीलप्रमाणे "मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे येवुन लेखी तक्रार देतो की, मी वर नमुद पत्त्यावर परिवारासह राहात असुन, मी प्राथमिक आरोग्य केन्द्र, सलोना ता. चिखलदरा जि.अमरावती येथे मागील 13 वर्षापासुन प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या पदावर कार्यरत आहे. मी कार्यरत असलेले क्षेत्र हे आदिवासी भागामध्ये येत असल्याने, या ठिकाणी 15 टक्के प्रोत्साहन भत्ता वेतनाच्या देय असल्याचे सन 2002 चे शासन निर्णयानुसार लागु करण्यात आलेला आहे. परंतु 2002 मध्ये चौथा व पाचव्या वेतन आयोगानुसार तिच रक्कम आजपावेतो कोणालाही पगारामध्ये लागु करण्यात आलेली नव्हती. मात्र सहावा व सातवा वेतन आयोग लागु झाल्यानंतर शासन स्तरावर 2002 च्या शासन निर्णयानुसार प्रोत्साहन भत्ता लागु राहील असे आदेशीत झाले. यावरुन शासन स्तरावरुन मा. विभागीय आयुक्त, अमरावती व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे कडुन प्राप्त पत्र व निधी पंचायत समिती स्तरावर नावानिशी उपलब्ध करण्यात आली. या निधीमध्ये माझेही नाव नमुद असल्याने, सदर रकमेची बिले काढण्याकरिता कार्यालयीन लिपीक श्रीमती प्रियंका सोळंके यांनी मला माझे मंजुर प्रोत्साहन भत्ता 1,31,000/- व प्रवास देयके 27,000/- असे एकुण 1,58,000/- रुपयाचे बिलांवर 10 टक्के लाच रकमेची मागणी केलेली होती. मी गैरअर्जदार यांचे मागणी नुसार पुर्तता न केल्याने आजपावेतो सुध्दा गैरअर्जदार यांनी माझे देयकाचा धनादेश बँकेत जमा केलेला नाही. मला प्राप्त माहीती नुसार 31 मार्च 2023 रोजी देयकाचा धनादेश तयार केलेला असुन, गैरअर्जदार यांनी सदरचा धनादेश बँकेत जमा केला नाही. दिनांक 03/05/2023 रोजी कनिष्ठ लिपीक श्रीमती दिपाली सोळंके यांनी माझे मोबाईल क्रमांक 9420722149 वर त्यांचे मोबाईल क्र. 9284514001 वरुन रात्री 08.22 मिनीटांनी फोन केलेला होता. परंतु मी दुस-या दिवशी दिनांक 04/05/2023 रोजी श्रीमती दिपाली सोळंके यांचा मिसकॉल बघितला व मी दिनांक 04/05/2023 चे वेळ 08.32 वाजता श्रीमती दिपाली सोळंके यांना पुन्हा कॉल केला असता, श्रीमती दिपाली सोळंके यांनी मला "तुमचे प्रोत्साहन भत्ता थकबाकी व प्रवास देयकाचा एकुण 10 टक्के प्रमाणे 16,000/- होतात ते मला तुम्ही नगदी किंवा फोन पे वर टाकुन द्या असे म्हणुन लाचेची मागणी केली व सोमवारी कार्यालयात येवुन भेटण्यास सांगीतले." परंतु मला लागु झालेला प्रोत्साहन भत्ता हा नियमानुसार मला भेटणे बंधनकारक असुन, मला त्याकरिता श्रीमती दिपाली सोळंके यांना कोणत्याही प्रकारची लाच देण्याची इच्छा नाही. तसेच श्रीमती दिपाली सोळंके यांचेशी माझे कोणतेही आर्थिक व्यवहार नाही. तसेच त्यांचे व माझे कोणतेही आपसी वैमनस्य नाही. मी माझे बचतीतील रुपये 16,000/- सापळा कार्यवाही करीता हजर करीत आहे. तसेच माझे कामासंबंधीचे कागदपत्रे, आधार कार्ड, व वाहनाचे कागदपत्रं○चे छायांकित प्रती सादर करीत आहे.अशी तक्रार दिल्यानंतर पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले यांनी त्यांचे कार्यालयात गोपनीय कामाकरिता पुर्वीपासुन हजर असलेले शासकीय पंच क्र. 1 श्री. प्रदिप गायगोले तसेच पंच क्र. 2. श्रीमती. ज्ञानेश्वरी दहीफळे या दोन शासकीय पंचांना पाचारण करुन, मला त्यांची ओळख करुन दिली. पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन, मी दिलेली लेखी तक्रार पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले यांचे सुचनेवरुन

पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले यांनी स्वाक्षरी
सदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली व तदनंतर पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर मी सापळा कार्यवाही करीता माझेकडे असलेले रुपये 16,000/- ज्यात (रू. 500/- दराच्या 32 चलनी नोटा) पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले यांचेकडे कार्यवाहीकरीता जमा केले. सदर नोटांना अ◌ॅथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन, तदनंतर लाचेच्या रकमेस अ◌ॅथ्रासीन पावडर लावून त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच सोनी कंपनीचा व्हॉईस रेकॉर्डर दाखवुन तो कशा प्रकारे काम करतो, याबाबत शासकीय पंचांना व मला सविस्तर माहिती दिली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले यांनी मला गैरअर्जदार हे त्यांचे कार्यालयात केव्हा मिळुन येतील? याबाबत विचारणा केली असता, मी त्यांना गैरअर्जदार यांनी मला दिनांक 08/05/2023 रोजी त्यांचे कार्यालयात मिळून येतील असे सांगितल्याने, पुढील सापळा कार्यवाही दिनांक 08/05/2023 रोजी सलोना ता.चिखलदरा जि.अमरावती येथुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. सविस्तर नोंदी प्रात्यक्षिक पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आल्या. दिनांक 06/05/2023 रोजी ठरविल्याप्रमाणे आज दिनांक 08/05/2023 रोजी पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले, दोन्ही पंच तसेच सापळा पार्टी सदस्य हे मला डिर्म मिलजवळ, परतवाडा येथे वेळ 11.30 वा.येवुन भेटले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले यांनी मला सलोना येथे जाण्याचा मार्ग विचारला तेव्हा मी त्यांना सांगितले की, मी गैरअर्जदार श्रीमती दिपाली सोळंके हे कार्यालयात हजर आहे किंवा कसे याबाबत माहीती घेतली असता, त्या अजुन कार्यालयात आलेल्या नसल्याचे समजले. त्यावरुन मी व सापळा पथक असे आम्ही गैरअर्जदार हे कार्यालयात येण्याची वाट पाहत परतवाडा येथेच थांबुन राहलो. परंतु पुष्कळ वेळ होवुन सुध्दा गैरअर्जदार श्रीमती दिपाली सोळंके या प्राथमिक आरोग्य केंन्द्र, सलोना येथे न आल्याचे समजल्याने सर्वानूमते गैरअर्जदार यांना पंचासमक्ष माझे मोबाईल क्र. 9420722149 यावरुन सोनी कंपनीचे व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन विचारले असता, गैरअर्जदार हे परतवाडा येथील एसबीआय बँकेजवळ येवुन भेटणार असल्याचे गैरअर्जदार यांनी फोनवर सांगितले. त्यावरुन सापळा पडताळणी एसबीआय बँकेजवळ, परतवाडा येथुन करण्याचे ठरविण्यात आले. पडताळणी दरम्यानचे संभाषण सोनी कंपनीचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगितले. व सोनी कंपनीचे व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवे कोरे 32 जिबी मेमोरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर पंच क्र. 1 यांचे आवाजात सुरु करुन, सदरचे व्हाईस रेकॉर्डर मी परिधान केलेल्या शर्टाचे आत धाग्याचे सहायाने लटकविण्यात आले. वेळ 17.00 वा अंजनगांव टी पॉईंट परतवाडा येथुन मी व पंच क्र. 1 श्री. गायगोले असे आम्ही माझे दुचाकी वाहन क्र. एमएच/27/एएम/3480 या वाहनाने पडताळणी करिता रवाना केले. मी व पंच क्र. 1 श्री. गायगोले असे आम्ही एसबीआय बँकेजवळ, परतवाडा येथे गेलो असता, तेथे पुर्वीपासुन गैरअर्जदार श्रीमती. दिपाली सोळंके हया त्यांचे परिवारासह त्यांचे चारचाकी वाहनात आमची वाट पाहात थांबुन होते. मी पंच क्र. 1 यांचे सोबत गैरअर्जदार हिला जावुन भेटलो असता, गैरअर्जदार श्रीमती दिपाली सोळंके हिने माझे प्रोत्साहन भत्ता थकबाकी व प्रवास देयकाचा एकुण 10 टक्के लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यावेळी मी श्रीमती दिपाली सोळंके यांना एम.टी.एम वरुन पैसे निघत नाही मी घरुन पैसे घेवुन येतो असे कारण सांगुन तेथुन निघुन पंच क्र. 1 यांचेसह पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले व सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत येवून पंच क्र. 1 यं◌ाच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर 17.35 वाजता बंद केला. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले यांनी सोनी कंपनीचे व्हाईस रेकॉर्डर मध्ये झालेले संभाषण ए◌ेकून गैरअर्जदार कनिष्ठ लिपीक श्रीमती दिपाली सोळंके यांनी माझे प्रोत्साहन भत्ता थकबाकी व प्रवास देयकाचा एकुण 10 टक्के लाचेची मागणी करुन, स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली.त्यानंतर पुढीलसापळा कार्यवाही लगेच करण्याचे सर्वानुमते ठरवून पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच गैरअर्जदार यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्यानंतर माझे पॅन्टचे डाव्या बाजुचे खिशात ठेवलेला रुमाल काढून आपला चेहरा पुसण्याचा इशारा करण्यास मला सांगितले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगितले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक योगिता चाफले यांनी पंचासमक्ष सापळा रचण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यानचे संभाषण सोनी कंपनीचे व्हाईस रेकॉर्डद्वार रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर अ◌ॅथ्रासीन पावडर लावलेले रू. 16,000/- (ज्यात रू. 500/- दराच्या 32 चलनी नोटा) पंच क्र.2 श्रीमती दहीफळे यांचे समक्ष पंच क्र. 1 यांचे हस्ते माझ्या शर्टच्या वरील डाव्या खिशात ठेवल्या. त्यानंतर वेळ 18.00 वा. व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन धाग्याच्या सहायाने माझे गळयात अडकवून पंच क्र. 1 श्री गायगोले यांचेसह गैरअर्जदार कनिष्ठ लिपीक श्रीमती दिपाली सोळंके यांचेकडे जाण्यास माझे दुचाकी वाहनाने रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग आले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 गैरअर्जदार थांबुन असलेल्या एसबीआय बँक समो◌ारील मुख्य रस्त्यावरील टी पॉईंट परतवाडा या ठिकाणी एसबीआय बँकेजवळ, परतवाडा येथे गेलो असता, तेथे हजर गैरअर्जदार श्रीमती दिपाली सोळंके हिचे पती श्री. पवार हे मला येवुन भेटले. मी त्यांना मॅडमशी भेटुन बोलायचे आहे असे म्हणुन त्यांचेसोबत

तक्रारदार श्रीमती दिपाली सोळंके या बसुन असलेल्या वाहनाकडे गेलो त्यांचेशी माझे कामाविषयी बोलणी करुन माझे प्रोत्साहन भत्ता थकबाकी व प्रवास देयकाचा एकुण 10 टक्के रु.16,000/-(ज्यात रु. 500/- दराच्या 32 चलनी नोटा) पंचासमक्ष स्विकारुन त्यांनी त्यांचे पती श्री. पांडुरंग पवार, यांचेकडे मोजण्यास दिले. त्यांचे पतीने सदरची रक्कम मोजतेवेळी नोटांना पावडर लावले आहे का असे म्हणुन सदरची रक्कम त्यांचे कडील चारचाकी वाहनाचे दारातील खान्यात ठेवुन दिले. मी सापळा पथकास मी माझे पॅन्टचे डाव्या बाजुचे खिशात ठेवलेला रुमाल काढुन त्यानंतर आपला चेहरा पुसण्याचा लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने तक्रारदार श्रीमती दिपाली सोळंके व तिचे पती श्री. पांडुरंग पवार यांना रंगेहात पकडून ताब्यात घेतले. त्यानंतर पंच क्र. 1 च्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर 16.20 वाजता बंद केला. सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उप अधिक्षक योगिता चापले यांनी पंचनामा क्र. 2 मध्ये घेतल्या आहेत. करीता आरोपी लोकसेवक श्रीमती. दिपाली मधुकरराव सोळंके वय 39 वर्ष पद-कनिष्ठ लिपीक (वर्ग-3) कार्यालय-प्राथमिक आरोग्य केन्द्र, सलोना ता. चिखलदरा रा.पंचायत समिती क्वार्टर, क्र. 4 दर्यापुर जि. अमरावती हिने मला माझे मंजुर असलेले प्रोत्साहन भत्ता थकबाकी व प्रवास देयकाचा एकुण रकमेच्या 10 टक्के लाचेची मागणी करुन, लाच रक्कम रुपये 16,000/- स्विकारुन लोकसेवक यांचे पती श्री. पांडुरंग धोंडुजी पवार रा. बेकरा ता.आकोट जि. अकोला यांना लाच रक्कम मोजण्यास दिली. तरी लोकसेवक श्रीमती दिपाली सोळंके हिने आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन पंचासमक्ष मला लाचेची मागणी करुन स्वतः व त्यांचे पतीचे सहकार्याने स्विकारले म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन, ती मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANDIP PRABHAKAR CHAVHAN(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरील वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)
पो.नि. अंमलदार
पोलीस स्टेशन, परतवाडा
**Name** (नाव): SANDIP PRABHAKAR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):